**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५** **निशाणी क्र. १८३**

साक्षीदार क्र. १२

मी शपथपुर्वक सांगते की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : जागृती जगन्नाथ चाळके, |
| वय | : ४० वर्षे, |
| व्यवसाय | : गृहिणी, |
| पत्ता | : पारसीवाडा, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई. |

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

१. मी आरोपी प्रज्योत भागवत यास ओळखत नाही. प्रज्योत भागवत याचे नाव मी माझ्या वहिणीचे भाऊ श्री. राहुल मारुती कोरपे याच्या तोंडून ऐकलेले आहे. राहुल व प्रज्योत हे दोघेही मित्र आहेत. मला राहुल कोरपे यानी ते स्वत: प्रज्योत भागवत याच्यासोबत शेअर मार्केटचा व्यवसाय करत असून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगितले होते.

२. मी साधारण फेब्रुवारी अथवा मार्च २०२१ मध्ये राहुल कोरपे यांच्याकडे एकदाच रु. २,००,०००/— शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी दिले होते. सदरील रक्कम मी माझे खाते असलेली बॅक स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा विर्लेपाले, मुंबई या खात्यावरील धनादेशाव्दारे दिली होती. माझ्या सदरील बॅकेतील खात्याचा क्रमांक ३९८२६०७३५१८ असा असून त्याचा खाते उतारा मी न्यायालयात दाखल केलेला आहे.

३. मी वरीलप्रमाणे गुंतवणूक केल्यानंतर मला सन २०२१ ते २०२४ या कालावधीमध्ये आरोपी प्रज्योत भागवत याने त्याच्या खात्यावरुन माझ्या वर नमूद बॅक स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा विर्लेपार्ले, मुंबई या खात्यावर रु. ०४,०५,०००/— ऐवढी रक्कम पाठवली होती.

४. त्यानंतर साधारणपणे ६ महिन्याने मी राहूल कोरपे यांना स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा विर्लेपार्ले, येथून रु. ४,००,०००/— काढून रोख स्वरुपात दि. ०६.११.२०२३ रोजी दिले होते. सदरील गुंतवणूकीनंतर आरोपी प्रज्योत भागवत याने मला माझ्या एचडीएफसी बॅक, शाखा अंधेरी पूर्व, खाते क्र.

५०१००५७७३७८०३ या खात्यावर रु. ०१,७५,०००/— ऐवढी रक्कम पाठवली होती. मला आरोपी प्रज्योत भागवत याने व्याजापोटी अशी एकूण रु. ५,८०,०००/— याचा परतावा केला होता. त्यानंतर माझे गुंतवणूकीचे खाते बंद करण्यात आल्याबाबत मला सांगण्यात आले. माझी व आरोपी प्रज्योत भागवत याची व्यतिगत कधीही भेट झाली नाही. मी माझ्या खात्याचे वरील कालावधीतील खाते उतारे हे दाखल केलेले असून त्यावर त्या व्यवहाराच्या नोंदी आहेत.

**<u>उलटतपास आरोपीकरीता ॲड. कपिल वर्मा यांचेतर्फे :—</u>**

५. मी आज जे खातेउतारे न्यायालयात दाखल केलेले आहेत ते खातेउतारे पोलिसांना तपासा दरम्यान दिलेले होते. पोलीसांनी तपासादरम्यान माझा जबाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरील खाते उतारे तपासादरम्यान पोलिसाना दिले होते असे न्यायालयास खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरील दस्त आज पहिल्यांदा न्यायालयात दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी प्रज्योत भागवत यास वैयक्तिकरित्या गुंतवणूकीसाठी कुठलीही रक्कम दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, राहुल कोरपे यांनी माझ्याकडून घेतलेली रक्कम कोठे गुंतवलेले होती याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मी आयकरदाता नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास:—</u>**

६. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**
स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०८/०६/२०२६.**